घेऊनही १६ दिवसांपासून फिरवाफिरव केली जात असल्याचे म्हटले आहे.

दिनेश पाटील, अभय खादी भांडारचे निखिल पिंगळे, उद्धव डिजिटलचे

# ५० हजार विद्यार्थ्यांची सायबर सुरक्षा जागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि क्वीक हेल फाउंडेशन यांच्यातील सामंजस्य करारान्वये जळगाव, धुळे, नंदुरबार या तीन जिल्ह्यात ५० हजार विद्यार्थ्यांची सायबर सुरक्षा जागृती करण्यात आल्याची माहिती क्वीक हेलचे अधिकारी अजय शिर्के यांनी दिली.

विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली क्वीक हेल फाउंडेशनच्या वतीने कमवा व शिका या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. व्यासपीठावर व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, दीपक पाटील, प्रा.नितीन बारी, संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.बी.व्ही.पवार, समन्वयक प्रा.मनीष जोशी उपस्थित होते. शिर्के म्हणाले की, या फाउंडेशनच्या माध्यमातून सायबर सुरक्षेबाबत तीन जिल्ह्यात २० हजार विद्यार्थ्यांपर्यंत संवाद साधण्याचे लक्ष्य होते. मात्र प्रतिसाद पाहता ५० हजार विद्यार्थ्यांपर्यंत जनजागृती करण्यात यश मिळाले. पुढच्या काळात सी प्लस प्लस प्रोग्राम सॉफ्टवेअर अभ्यासक्रम विद्यापीठात सुरु केला जाणार आहे. अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.पाटील यांनी क्वीक हेल फाउंडेशनसमवेत झालेल्या करारांतर्गत लवकरच सायबर सुरक्षेवर प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे, अशी माहिती दिली. प्रा.मनिष जोशी यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन पूजा व ऐश्वर्या जगताप यांनी केले. प्रा.मनोज पाटील यांनी आभार मानले.